विधी अभ्यासक्रम प्रवेश व त्याअनुषंगाने उद्भणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी "विधी शिक्षण सल्लागार समिती" गठीत करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : सीईटी-१०१६/प्र.क्र.२६६/मशि-२,**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : २४ नोव्हेंबर, २०१६.

<u>वाचा</u> : संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. अशिसं/विधी/१६-१७/मवि-२/११९३९, दि.१७.१०.२०१६.

**प्रस्तावना :**

सन २०१६-१७ साठी विधी पदवी अभ्यासक्रमांची सामायिक प्रवेश प्रक्रिया राबविताना आलेल्या अडचणी तसेच मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.६६०८/२०१६ या प्रकरणी, सदर प्रवेश प्रक्रियेमध्ये बार कौन्सिल ऑफ इंडिया व विधी व न्याय विभागाचा समावेश करण्याबाबत दिलेले निर्देश विचारात घेवून, पुढील शैक्षणिक वर्षापासून विधी पदवी अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये उद्भवणाऱ्या अडचणींबाबत शासनास मार्गदर्शन करण्यासाठी "विधी शिक्षण सल्लागार समिती" स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

सन २०१६-१७ साठीच्या विधी पदवी अभ्यासक्रमांची सामायिक प्रवेश प्रक्रिया राबविताना आलेल्या अडचणी तसेच मा. उच्च न्यायालयाने सदर प्रवेश प्रक्रियेत बार कौन्सिल ऑफ इंडिया व विधी व न्याय विभागाचा समावेश करण्याबाबत दिलेले निर्देश विचारात घेवून, शासनास मार्गदर्शन करण्यासाठी खालीलप्रमाणे **"विधी शिक्षण सल्लागार समिती"** स्थापन करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**समितीची रचना :-**

| अ.क्र. | पदनाम | समितीचे पदाधिकारी |
|---|---|---|
| १ | कुलगुरु, नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, मुंबई | अध्यक्ष |
| २ | कुलगुरु, नॅशलन लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, बांद्रा, मुंबई | सदस्य |
| ५ | खालील विद्यापीठाचे विधी विभागाचे प्रमुख :-<br>१) मुंबई विद्यापीठ, मुंबई( डॉ. रश्मी ओझा,प्राध्यापक व विभाग प्रमुख)<br>२) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे(डॉ. दुर्गामिनी पटेल, प्राध्यापक व विभाग प्रमुख) | ०२ सदस्य |
| ६ | उपाध्यक्ष, स्टेट बार कौन्सिल ऑफ इंडिया, महाराष्ट्र | सदस्य |
| ७ | प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालय, मुंबई | सदस्य |
| ८ | प्राचार्य, अशासकीय अनुदानित विधी महाविद्यालय किंवा त्यांचे प्रतिनिधी (डॉ. हेमा मेनन, सहयोगी प्राध्यापक, परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दिक्षाभूमी यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, डिपार्टमेंट ऑफ लॉ, दिक्षाभूमी, नागपूर | सदस्य |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |

**समितीची कार्यकक्षा :-**

सदर समिती पुढील बाबींबाबत सीईटी कक्ष व शासनास मार्गदर्शनपर शिफारस करेल :-

१. विधी पदवी अभ्यासक्रमांच्या सामायिक प्रवेश परीक्षेचे वेळापत्रक.
२. सामायिक प्रवेश परीक्षेचा पाठ्यक्रम.
३. समितीने प्रसिध्द केलेल्या पाठ्यक्रमाच्या आधारे तयार होणारी पुस्तके जसे, परीक्षा गाईड्स, नोट्स, इतर व्यावसायिक वेब साईटवर शासनाच्या सीईटीबाबत प्रसिध्द होणारी माहिती इत्यादी सोशल माध्यमाद्वारे प्रसिध्द होणाऱ्या माहितीची व्यवहार्यता तपासणे व त्याअनुषंगाने आवश्यक सूचना करणे.
४. सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान उद्भवणाऱ्या/प्राप्त होणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
५. प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेमध्ये उद्भवलेल्या अडचणींच्या आधारे प्रवेश प्रक्रिया नियमांची अधिसूचना/शासन निर्णय यामध्ये आवश्यक ते बदल सूचविणे.
६. विधी महाविद्यालयांच्या बाबतीत शासनस्तरावरुन हाताळण्यात येणाऱ्या बार कौन्सिल ऑफ इंडियाशी संबंधित मुद्यांबाबत तसेच धोरणात्मक निर्णयाबाबत शासनास यथायोग्य मार्गदर्शन करणे.
७. प्रवेश प्रक्रियेशी संबंधित न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासनास मार्गदर्शन करणे.
८. एकंदरीत विधी प्रवेश प्रक्रिया सुरळीत/पारदर्शक होण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील विधी शिक्षण दर्जेदार होण्याकरिता आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

३. सदर समितीच्या बैठका संचालक, उच्च शिक्षण तथा सदस्य सचिव यांनी आवश्यकतेनुसार आयोजित कराव्यात. सदर समितीच्या सदस्यांचा प्रवास व दैनिक भत्ता व इतर आवश्यक असणाऱ्या आर्थिक बाबींसाठी येणारा खर्च हा “लेखाशीर्ष-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ८०-सर्वसाधारण, ००१, संचालन व प्रशासन (२२०२ २६४१), ११- देशांतर्गत प्रवास खर्च, १३-कार्यालयीन खर्च” या लेखाशीर्षाखालील खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१६११२४१६०८४२९८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Urmila Vaibhav Joshi

Digitally signed by Urmila Vaibhav Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Urmila Vaibhav Joshi
Date: 2016.11.24 16:10:46 +05'30'

( उर्मिला जोशी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
२. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१,
३. कुलगुरु, नॅशलन लॉ युनिर्व्हसिटी, मुंबई,नागपूर,
४. उपाध्यक्ष, स्टेट बार कौन्सिल ऑफ इंडिया, महाराष्ट्र,
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

६. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
११.विधी विभाग प्रमुख, मुंबई विद्यापीठ, पुणे विद्यापीठ,
१२.प्राचार्य, शासकीय विधी महाविद्यालये, मुंबई,
१३.संबंधित प्राचार्य/प्रतिनिधी, अशासकीय अनुदानित विधी महाविद्यालय, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
१४.मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
१५.मा. राज्यमंत्री (उच्च वतंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
१६.प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
१७.निवड नस्ती/मशि-२.